## Inter-collegiate Cross country Runner Up Team 2019-20




## Inter-collegiate Cross Country Second Runner Up Team 2019-20



## Inter-Class  Cross Country inauguration 2019-20



## Inter-Class  Chess Competition  2019-20



## Inter-Class Badminton Competition 2019-20



## Kumar Gat Kabaddi Girls Camp 2019-20



# National Sports Day Celebration 2020-21



# Arrange Track For Staff 2020-21




SHOT ON OPPO

# Celebration of International Yoga day Corona Pandemic 2020-21



# Word Psychological Day Online Webinar 2020-21












पुणे PLUS

# मानसिक आरोग्याची साक्षरता आवश्यक

**डॉ. हमीद दाभोलकर यांचे प्रतिपादन**

म. टा. वृत्तसेवा, मंचर


'मानसिक आरोग्याचे अनेक पैलू आहेत. जीवनातील आव्हानांना सामोरे जाताना लवचीकता ठेवणे, स्वतःबद्दल आत्मविश्वास बाळगणे, वास्तववादी विचार करणे, ताणतणावाचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने करणे या पैलूंबाबत समाजातील अज्ञान, उदासीनता, गैरसमज दूर करून, मानसिक आरोग्यबाबत समाजाला साक्षर करणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हमीद दाभोलकर यांनी व्यक्त केले.

येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयामध्ये जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त, मानसशास्त्र विभाग, शारीरिक शिक्षण विभाग आणि 'विवेकवाहिनी' यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या ऑनलाइन कार्यक्रमात 'मनाचे आरोग्य कसे जपावे' या विषयावर डॉ. दाभोलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कानडे होते. उपप्राचार्य डॉ. ए. बी. निकुंभ, शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. एस. पी. पानसरे यांनी कार्यक्रमात ऑनलाइन सहभाग घेतला.

प्राचार्य डॉ. के. जी. कानडे म्हणाले, 'जगभरात घडणाऱ्या असंख्य आत्महत्यांच्या मागे नैराश्य हे प्रमुख कारण आहे. नैराश्यावर वेळीच उपचार केल्यास आपण आत्महत्या थांबवू शकतो. त्यासाठी मानसिक आरोग्याबाबत वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याची गरज आहे.' महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'मानसिक आरोग्य सल्ला केंद्र' सुरू करणार असल्याचेही प्राचार्य कानडे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे प्रमुख प्रा. संतोष पवार यांनी केले. मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा. व्ही. बी. अडसरे यांनी आभार मानले. महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी ऑनलाइन माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# Word Health Day Online Webinar 2020-21






# District Level Half Marathon(21K.M Run) Gold Medal 2021-22



# District Level Half Marathon(21K.M Run) Silver Medal 2021-22



# News Paper News of District Level Half Marathon(21K.M Run) Competition 2020-21

नवराष्ट्र

## हाफ मॅरेथॉन स्पर्धेत निघोट, भोरचे यश

### यशस्वी खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**मंचर**, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कॅम्पसमध्ये झालेल्या जिल्हास्तरीय हाफ मॅरेथॉन (२१ किलो मीटर धावणे) स्पर्धेत येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील सुनिल निघोट आणि सुरज भोर यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला. निघोट याने २१ किलोमीटर अंतर १ तास १४ मिनिटे १० सेकंदात पूर्ण करत प्रथम क्रमांक संपादन केला. तर सूरज भोर याने एक तास १६ मिनिटे २१ सेकंदात २१ किलोमीटर अंतर धावून द्वितीय क्रमांक संपादन केला. सविता डामसे हिने मुलींमध्ये एक तास ४८ मिनिटात स्पर्धा पूर्ण करुन तृतीय क्रमांक संपादन केला. तसेच संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुल इंद्रायणी नगर, भोसरी



येथे झालेल्या मैदानी स्पर्धेत सुरज भोर याने पाच किलोमीटर धावणे स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत कांस्यपदक मिळवले. निकिता पडवळ हिने हातोडा फेक स्पर्धेत सहभागी होऊन सुवर्णपदक पटकावले. या यशाबद्दल गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, पंचायत समितीचे सदस्य राजाराम बाणखेले, उदय पाटील, प्राचार्य के. जी. कानडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. प्रा. डॉ. सुनील पानसरे व प्रा. सागर काळे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. सर्व खेळाडूंची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली.

Pune Plus Edition
15 December 2021 Page No. 3
epaper.navarashtra.com

# District Level Cross Country Winner Team 2021-22



# District Level Cross Country Second Runner Up  Team 2021-22



## Zonal Level Cross Country Team PDZSC 2021-22




## Principal Dr.K.G.Kanade Handover Running Shoes to Sunil Nighot for Preparation of National Level Competition 2021-22



# District Level Kabaddi Runner Up Team 2021-22



# District Level Hammer Throw Gold Medal 2021-22



# Nikita Padawal Resived Best Raidar Award & Gold Medal West Zone Inter University Kabaddi Tournament 2021-22






# 68 & 69 Senior State Kabaddi Tournament Winner Pune District Team 2021-22







# Best Sports College Award 2021-22






# Celebration of National Sport day & Fit India Run 2021-22


























# कर्मवीरांनी शिक्षणाची चळवळ खेड्यांत पोचवली : बाळासाहेब बेंडे

**मंचर : पुढारी वृत्तसेवा**

रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून घडलेले विद्यार्थी उच्च पदस्थ म्हणून काम करीत आहेत. कर्मवीरांनी शिक्षणाची चळवळ खेडोपाड्यांत पोहचवल्याने खेड्यातील विद्यार्थीही शिक्षणप्रवाहात आले. त्यामुळे शैक्षणिक चळवळीला गती आली, असे मत भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी व्यक्त केले.

मंचर येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांच्या परितोषिक वितरण प्रसंगी ते बोलत होते. पंचायत समितीचे सदस्य राजाराम बाणखेले, बाळासाहेब बाणखेले, उद्योजक उदयराव पाटील या वेळी उपस्थित होते. अभ्युदय बायोटेकचे सीईओ साहेबराव मेंगडे यांनी चंदन व गुळवेल या औषधी वनस्पतींची १३४ रोपे महाविद्यालयाला दिली. कोरोना लसीकरण नावनोंदणी केंद्राचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्राणिशास्त्र विभागामार्फत हिवताप निर्मूलनासाठी गप्पी माशांचे वितरण प्राचार्य डॉ. के. जी. कानडे, कार्यालयीन अधीक्षक प्रभाकर पारधी यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रथम दोन विजेत्या स्पर्धकांना गौरविण्यात आले. प्रश्नमंजूषा प्राजक्ता गाडे, पूनम चिखले, चित्रकला प्रवीण लोहकरे, प्रतिमा पडवळ, काव्यलेखन ॠतिका एरंडे, साक्षी पारेख, निबंधलेखन काजल टेमकर, ज्ञानेश्वरी शिंदे, व्हिडीओ क्लिप/ॲनिमेशन अनुराग डोके, विशाल शेळके, फिट इंडिया स्पर्धा मुले सूरज भोर, साहिल चासकर, मुली अनिशा टेमगिरे, मानसी हिंगे, शिक्षक पुरुष गट प्रा. संजयकुमार पोकळे, प्रा. अरुण वळवी, प्रा. भगवान ढगे. महिला प्रा. हेमांगी गावीत, जनाबाई शिंदे, प्रा. सपना उगले. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. कैलास एरंडे यांनी केले. परितोषिकांचे वाचन प्रा. डॉ. गाडी यांनी केले. स्पर्धेचे संयोजन प्रा. राधाकृष्णा मुंठे व प्रा. सुनील पानसरे यांनी केले. आभार प्रा. डॉ. ए. बी. निकुंभ यांनी मानले.



**मंचर येथील आवटे महाविद्यालयात कार्यक्रमप्रसंगी बोलताना भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे.**

# Organized District Level Kabaddi Men Competition 2021-22





# युवकांमध्ये खिलाडूवृत्ती आवश्यक : बेंडे

## ५१ विविध महाविद्यालयांचे संघ, मार्गदर्शक, क्रीडाप्रेमींची उपस्थिती

मंचर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. खेळात जय पराजय ठरलेला असतो. कोण जिंकले हे खेळात महत्वाचे नसुन खेळ भावना जपून इतरांची मन जिंकणारा संघ जिंकत असतो. खेळाडुंनी खिलाडूवृत्तीने खेळावे, असे आवाहन भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी केले. मंचर (ता.आंबेगाव) येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रिडा समिती यांच्या वतीने मुलांच्या आंतरमहाविद्यालयीन दोन दिवसीय कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे पाटील बोलत होते.



### सांस्कृतिक कला प्रकारात सहभागी व्हावे

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.जी.कानडे ,पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा.रावसाहेब गरड, सहसचिव ज्येष्ठ क्रीडा शिक्षक प्रा.शकूर सय्यद, डॉ.विद्या पठारे पठारे,पंचायत समितीचे सदस्य राजाराम बाणखेले, महाविद्यालय विकास समिती सदस्य बाळासाहेब बाणखेले, ॲड.बाळासाहेब पोखरकर, कबड्डी खेळाडू लक्ष्मण भक्ते, पंच पॅनेल प्रमुख राजन वाबळे आदी उपस्थित होते.

### कबड्डी स्पर्धा

पदवीसाठी विद्यापीठाने अभ्यासक्रमाबरोबर क्रेडिट पद्धती सुरु केली असून विद्यार्थ्यांने आठ क्रेडीट प्राप्त करणे बंधनकारक आहे. यासाठी विद्याथ्यानी क्रीडा व सांस्कृतिक कला प्रकारात सहभागी व्हावे .असे मत प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांनी व्यक्त केले. ५१ विविध महाविद्यालयांचे संघ, त्यांचे मार्गदर्शक, क्रीडाप्रेमी उपस्थित होते.दोन दिवसीय कबड्डी स्पर्धेतून पुणे विद्यापीठाचा पुणे जिल्हा ग्रामीण पुरुष संघ निवडला जाणार आहे .कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. सुनील पानसरे,आभार प्रा.कैलास एरंडे यांनी मानले.

---

# खेळभावना बनविते मोठे : बाळासाहेब बेंडे




मंचर येथील आवटे महाविद्यालयात कार्यक्रमप्रसंगी बोलताना भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे पाटील.

**मंचर : पुढारी वृत्तसेवा**

खेळाडूंनी खिलाडूवृत्तीने खेळावे. खेळ आणि आरोग्य यांचा जवळचा संबंध असून, क्रीडा क्षेत्रात वेगवेगळ्या लीगच्या माध्यमातून आज करिअरची संधी उपलब्ध होत आहे, असे मत भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी व्यक्त केले.

मंचर (ता. आंबेगाव) येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या वतीने मुलांच्या आंतरमहाविद्यालयीन दोनदिवसीय कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बेंडे पाटील बोलत होते.

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कानडे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. रावसाहेब गरड, सहसचिव ज्येष्ठ क्रीडा शिक्षक प्रा. शकूर सय्यद, डॉ. विद्या पठारे, पंचायत समितीचे सदस्य राजाराम बाणखेले, महाविद्यालय विकास समिती सदस्य बाळासाहेब बाणखेले, ॲड. बाळासाहेब पोखरकर, कबड्डी खेळाडू लक्ष्मण भक्ते, पंच पॅनेलप्रमुख राजन वाबळे आदी उपस्थित होते.

पदवीसाठी विद्यापीठाने अभ्यासक्रमाबरोबर क्रेडिट पद्धती सुरू केली असून, विद्यार्थ्यांने आठ क्रेडिट प्राप्त करणे बंधनकारक आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी क्रीडा व सांस्कृतिक कलाप्रकारात सहभागी व्हावे, असे मत प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांनी व्यक्त केले. ५१ विविध महाविद्यालयांचे संघ, त्यांचे मार्गदर्शक, क्रीडाप्रेमी या वेळी उपस्थित होते. दोनदिवसीय कबड्डी स्पर्धेतून पुणे विद्यापीठाचा पुणे जिल्हा ग्रामीण पुरुष संघ निवडला जाणार आहे. प्रास्ताविक महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. सुनील पानसरे यांनी केले. प्रा. कैलास एरंडे यांनी आभार मानले. स्पर्धेच्या आयोजनात प्रा. सागर काळे, जिमखाना समिती तसेच कबड्डी खेळातील विद्यार्थ्यांचे योगदान लाभले.

# Organized District Level Cricket Men Competition 2021-22









# Organized District Level Cricket Women Competition 2021-22






# Organized Self Defiance Programmed for Girls 2021-22




**नवराष्ट्र**

▮ कार्यशाळेत ९२ मुलींचा सहभाग ▮

## विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे



मंचर, (वा.) येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान एकदिवसीय कार्यशाळेत विद्यार्थीनींना अत्याचाराविरुद्ध तोंड देण्यास सक्षम करण्यासाठी त्यांच्या संरक्षणार्थ जागृती निर्माण करुन गार्गी वळसे काळे यांनी मार्गदर्शन केले.

मंचर येथील विद्यार्थी विकास मंडळ,विद्यार्थिनी मंच व तक्रार निवारण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेस ९२ विद्यार्थीनी आणि प्राध्यापक उपस्थित होते. कार्यशाळेचे उद्घाटन ज्ञानशक्ती विकास वाहिनी स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकारी संचालिका गार्गी काळे (वळसे), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांच्या हस्ते करण्यात आले.

पहिल्या सत्रात काळे यांनी विद्यार्थिनींना अत्याचाराविरुद्ध तोंड देण्यास सक्षम करण्यासाठी त्यांच्या संरक्षणार्थ जागृती निर्माण करुन मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात विद्यार्थीनीना सक्षम बनविण्यासाठी ज्युदो-कराटेचे प्रत्यक्ष प्रशिक्षण व स्व बचावासाठी काही टिप्स घोडेगांव येथील कराटे प्रशिक्षक जयेश थोरात यांनी दिले. प्राचार्य डॉ. कानडे यांनी मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. बी. पी. गार्डी, प्रा. जी. सी. वाघ, प्रा. डॉ. एन. बी. आडमुठे उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. व्ही. पी. सुपेकर यांनी केले. नियोजन प्रा. टी. वाय. रणदिवे यांनी तर आभार प्रा. डॉ. एस. पी.पानसरे यांनी मानले.

Pune Plus Edition
12 February 2022 Page No. 3
epaper.navarashtra.com




Rayat Shikshan Sanstha's,
Annasaheb Awate Arts,Commerce and
Hutatma Babu Genu Science College,
Manchar , Dist-Pune.
"Education through self-help is our motto"
Karmaveer
National Webinar On
Career Opportunities in Military/Defense Services
(Army,Navy & Air-Force)
Jointly Organized by
Department of Physical Education and
Competitive Examination & Career Guidance Center
Auspicious Presence
Hon.Uday Patil
CDC -Member
Resource Person
Col.Nitteguthu Sharath Bhandary(Rtd)
President
Hon.Principal - Dr.K.G.Kanade
Date-11/8/2021
Time: 11.00.am
Zoom Link: https://us02web.zoom.us/j/83183919008?pwd=dkxIMkxKMDBsblc2RGhmODVBZTV0Zz09
You tube live Link: https://www.youtube.com/channel/UClPmGFordjTbP5mlPyG84EA
Organizing Committee
Prof. Dr.Sunil Pansare
(Dept. of Physical Education & Sports )
Prof.Vishnu Adsare
(Competitive Examination & Career Guidance Center )



# Chikhale Asmita Got Gold Medal International Lavel Taekwondo Championship 2021-22

